# बिट्स पिलानी के के बिर्ला गोवा कॅम्पसचा ११ रोजी दीक्षान्त सोहळा



**प्रा. राजेश गोखले**

प्रतिनिधी
वास्को

सांकवाळ येथील बिट्स पिलानी के के बिर्ला गोवा कॅम्पसचा दीक्षान्त सोहळा रविवार दि. ११ सप्टेंबर रोजी संस्थेच्या सभागृहात आयोजित करण्यात आला आहे. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून जैवतंत्रज्ञान विभागाचे सचिव प्रा. राजेश सुधीर गोखले उपस्थित असतील. यावेळी बिट्स पिलानी के के बिर्ला गोवा कॅम्पसचे संचालक प्रा. सुमन कुंडू, उपकुलगुरु प्रा. सौविक भट्टाचार्य उपस्थित असतील. यावेळी पाहुण्यांच्या हस्ते माजी विद्यार्थ्यांना पुरस्कार तसेच पदवीप्राप्त विद्यार्थ्यांना पदवी व पुरस्कार प्रदान करण्यात येतील.